MHST110005232022

## फौ. कि. अर्ज क्र.१०८/२०२२ मधील निशाणी क्र.५ खालील आदेश

सदरचा अर्ज अर्जदार यांनी सामनेवाला विरुध्द तूर्तातूर्त पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारा यांचे कथनाप्रमाणे अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि.०४.०५.१९९४ रोजी मौजे करंदोशी, पो. आलेवाडी, ता. जावली, जि. सातारा येथे बौध्द धर्मशास्त्राप्रमाणे रुढीरितिरिवाजाप्रमाणे झालेला आहे. अर्जदार ही विवाहानंतर सामनेवाला यांचेकडे मौजे मालतपुर, ता. वाई, जि. सातारा येथे नांदणेस गेली. सामनेवाला यास कोणतीही नोकरी नव्हती त्यामुळे त्यास व्यवसाय करणेचा होता व त्याकरीता पैशाची आवश्यकता होती. म्हणून सामनेवाला याने अर्जदार हिला माहेराहून पैसे आणणेस सांगितले. त्यावेळी अर्जदार हिचे आईने १ तोळा सोन्याची बोरमाळ, अंगठी अर्धा तोळा, सोन्याची नथ असे दागिने सामनेवाला यास दिले. सामनेवाला याने डेअरी सुरु केली. परंतू व्यवसाय चालला नसल्यामुळे बंद करुन सामनेवाला मुंबई गेला.

३. अर्जदार यांचे वडीलांनी संसारपोयागी भांडीकुंडी जेवणखाण याकरीता सुमारे रु.६०,०००/– इतका खर्च करुन लग्न करुन दिले आहे. सदर विवाह बंधनातून अर्जदारास दि.११.१०.१९९५ रोजी जागृती नामे मुलगी झाली आहे. अर्जदार हिची आई पोटाचे विकाराने आजारी असलेने अर्जदार त्यांना पाहण्यास माहेरी करंदोशी येथे गेली असता सामनेवाला हा अर्जदार ही हाताने अपंग असलेचा उल्लेख वारंवार करुन तिची हेटाळणी करत होता व घरातील लोकांसमक्ष अपमार करत होता. अर्जदार माहेरी गेलेचे निमित्त करुन सामनेवाला यांनी अर्जदार हिस नांदणेस कधीही घेतले नाही. अर्जदार हिचे वडीलांनी सामनेवाला यास अर्जदार हिस नांदवण्याची विनंती केली परंतू सामनेवाला याने

अर्जदार हिस नांदवले नाही.

४. अर्जदार पुढे कथन करते की, सामनेवाला याचे विवाहबाहय संबंध असलेचे निदर्शनास आले असता त्याबाबत विचारणा केली तेव्हा सामनेवाला याने अर्जदार हिस मारहाण केली. सामनेवाला हा बापूसाो शिंदे माध्यमिक विद्यालय चिखली येथे शिपाई म्हणून कार्यरत आहे. सामनेवाला याने अर्जदार व मुलगी जागृती यांचेकरीता कधीही कोणतेही खर्च केलेले नाहीत. अर्जदार व मुलीचा सांभाळ व शिक्षणाचा खर्च हे अर्जदार हिचे वडील व त्यांचेपश्चात आई करत आहे. अर्जदार हिचा सांभाळ करणेची जबाबदारी सामनेवाला यांची आहे. सामनेवाला यांचे आडमुठ्या विचारांमुळे अर्जदार हिस मानसिक त्रास होत आहे.

५. अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे. अर्जदाराचे पालनपोषणाची, कपडालत्ता, औषधपाणी याची जबाबदारी सर्वस्वी सामनेवाला याची असून ती त्याने नाकारली आहे. त्यामुळे, अर्जदार हिस आईचे मेहरबानीवर दिवस काढावे लागत आहेत. सामनेवाला यास शेतीतून वार्षिक रु.५०,०००/- एवढे उत्पन्न मिळते. तसेच, सामनेवाला हा शासकीय नोकरी करीत आहे व दरमहा रु.५०,०००/- पगार मिळतो. सामनेवाला याची आर्थिक परिस्थिती उत्तम असून त्याची पोटगी देण्याची ऐपत आहे. सबब, अर्जदार हिने सामनेवाला याचेकडून दरमहा रक्कम रु.१५,०००/- अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंतच्या कालावधील अंतरिम पोटगी मिळणेची विनंती केली आहे.

६. सामनेवाला यांनी निशाणी क्र.१५ अन्वये म्हणणे दाखल करुन अर्जदाराचे अर्जातील लग्नाचा मजकूर व मुलगी जागृती हिचा जन्म वगळता इतर सर्व कथने नाकारली आहेत. सामनेवाला यांचे म्हणणे की, अर्जदार लग्नानंतर काही दिवस व्यवस्थित नांदल्या व कालांतराने घरातील लोकांशी काहीही कारण नसताना किरकोळ कारणांवरुन भांडण करु लागल्या. अर्जदार यांची माहेरची आर्थिक परिस्थिती सधन असल्याने अर्जदाराला माहेरीच राहण्यात रुची होती. सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती अर्जदाराच्या आर्थिक

परिस्थितीपेक्षा हलाकिची असल्याने अर्जदार व अर्जदाराचे आई वडील नेहमी सामनेवाला यांचा अपमान करत असत. सामनेवाला यांनी घरजावई म्हणून रहावे अशी अर्जदार व त्यांचे आई वडील यांची मागणी होती. अर्जदार हिची सासरी मालतपुर येथे राहण्याची अजिबात इच्छा नव्हती.

७. सामनेवाला पुढे कथन करतात की, अर्जदाराचे बाळंतपणानंतर सामनेवाला अर्जदारास सासरी नेण्याचा वारंवार प्रयत्न करीत होते, परंतू अर्जदार टाळत होत्या. सामनेवाला व त्यांचे कुटुंबियांनी अर्जदार हिस वारंवार विनंती केल्यानंतर अर्जदार सामनेवाला यांचेसोबत मालतपुर येथे राहण्यास गेल्या. परंतू, २ महिन्यानंतर कोणत्याही सबळ कारणाविना अर्जदार कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेल्या. सामनेवाला यांनी शोध घेतला अर्जदार या माहेरी निघून गेल्याचे समजले. सामनेवाला व त्यांचे कुटुंबियांनी अर्जदार हिस पुन्हा नांदण्यास नेण्याचा प्रयत्न केला असता अर्जदार हिने कोणताही प्रतिसाद दिला नाही.

८. सामेनवाला पुढे कथन करतात की, अर्जदार यांनी स्वतःहून सामनेवाला यांचा त्याग केलेला आहे. सामनेवाला यांनी बापुसो शिंदे माध्यमिक विद्यालय येथे १९९७ मध्ये शिपाई म्हणून विना अनुदान तत्वावर काम केले. अर्जदारांनी सामनेवाला यास त्यांच्या मुलीच्या लग्नाची कल्पनाही दिली नाही. अर्जदार यांनी सदरचा अर्ज निव्वळ सामनेवाला यांना त्रास देण्याच्या उद्देशाने केलेला आहे. अर्जदारांची माहेरची परिस्थिती सधन व उत्तम आहे. याउलट सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. सामनेवाला यांचे एकत्र कुटुंब असल्याने कुटुंबाची सर्व जबाबदारी सामनेवाला यांचेवर आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाहासाठी सामनेवाला यांनी वाई तालुका शिक्षक शिक्षकेतर पतसंस्था येथील २० लाख व सातारा जिल्हा मध्यवर्ती OD A/C येथे २.५ लाख एवढे कर्ज घेतलेले आहे. सामनेवाला हा पूर्णपणे कर्जबाजारी असून अन्य कोणत्याही मार्गाने सामनेवाला यास उत्पन्न मिळत नाही. तसेच, शेतीमधून कसलेही उत्पन्न मिळत नाही.

९. सामेनवाला पुढे कथन करतात की, सामनेवाला यांना सध्या अतिशय

तुटपुंजे उत्पन्न मिळत आहे. सामनेवाला यांचे आई वडील हे वयोवृध्द आहेत, त्यांचे आजारपणदेखील सामनेवाला यांस पहावे लागते. अर्जदार हिस कोणत्याही प्रकारची पोटगी, खर्च अगर नुकसानभरपाई देण्याची सामनेवाला यांची ऐपत नाही. अर्जदार यांनी मागणी केलेली अंतरिम पोटगीची रक्कम अवास्तव, काल्पनीक व सामनेवाला यांच्याकरीता अशक्य अशा स्वरुपाची आहे. सामनेवाला हे अर्जदार हिस आजही सांभाळणेस तयार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह रद्द करण्याची विनंती केली आहे.

१०. अर्जदारतर्फे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. सामनेवाला हे युक्तिवादाकामी गैरहजर. अर्जाचे निकालासाठी पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार हिचेवर घरगुती हिंसाचार झाल्याचे अर्जदार प्रथमदर्शनी शाबित करते काय ? | **.. होय ..** |
| २) | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **.. अंशतः होय .. अर्जदार हिस दरमहा रक्कम रु.८,०००/-.** |
| ३) | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता :-</u>**

११. अर्जदार व सामनेवाला यांच्यातील विवाहसंबंध अद्याप कायम आहेत. अर्जात व म्हणण्यामध्ये केलेले आरोप व प्रत्यारोप हे अर्जाचा निकाल गुणदोषांवर होवून ठरतील. अर्जदार जेव्हापासून माहेरी रहात आहे तेव्हापासून सामनेवाला यांनी अर्जदार यांना उदरनिर्वाहाकरीता रक्कम दिल्याची बाब दिसून येत नाही. अर्जदार यांना सांभाळण्याची

नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही सामनेवाला यांची आहे, ती त्याला टाळता येणार नाही. सामनेवाला यांचे कथन आहे की, गेल्या २८ वर्षांमध्ये अर्जदार यांनी पोटगी मागितली नाही. आता अर्जदार यांनी सामनेवाला क्र.१ यास त्रास देण्यासाठी पोटगी मागितली आहे. अर्जदार यांनी गेले २८ वर्ष पोटगी का मागितली नाही याचा निर्णय मूळ अर्जाचा गुणावगुणावर निकाल झाल्यावरच ठरेल. अर्जातील कथनानुसार अर्जदार हिचा स्वतःचा चरितार्थ चालवण्यासाठी पैशांची आवश्यकता आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते.

१२. सामनेवाला यांनी निशाणी क्र.२२ सोबत त्यांचा पगार खाते उतारा दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांना फेब्रुवारी, २०२३ पर्यंत रक्कम रु.५३,०००/– इतका पगार असल्याचे दिसत आहे. त्यामध्ये रु.३५,०००/– त्यांचे कर्जापोटी वजा झाल्याचे दिसत आहे. मार्च २०२४ मध्ये सामनेवाला यांचे पगारामध्ये रक्कम रु.५,०००/– ने वाढ झाली असे गृहीत धरल्यास हरकत नाही. सामनेवाला यांनी २०२४ सालचा खाते उतारा दाखल केलेला नाही. सामनेवाला यांनी जे कर्ज काढलेले आहे ते त्यांनी स्वतःच्या सुखसोयीसाठी काढल्याचे दिसून येत आहे. सामनेवाला हे अर्जदार यांना पोटगी देण्यास सक्षम आहेत असे दिसून येते. सदर सामनेवाला यांचे उत्पन्नाचे अवलोकन केले असता सामनेवाला हे अर्जदार यांना दरमहा रक्कम रु.८,०००/– पोटगी देण्यास सक्षम आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला याने अर्जदार हिस दरमहा रक्कम रु.८,०००/– अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुत अर्जाच्या दाखल तारखेपासुन मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत द्यावी.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2024.03.16 04:24:53 +0530

**ठिकाण** – मेढा
**दिनांक** – १६.०३.२०२४

रविंद्र भ. खवले,
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा**